**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक :-१ दिनांक ७/४/२००७

ठराव क्रमांक :- १ दिनांक ७/४/२००७

**प्रस्तावाचा विषय:-**मा.स्थायी समिती सभा दिनांक १७/२/२००७,दिनांक २८/२/२००७,दिनांक ५/३/२००७ व दिनांक २०/३/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सौ.काळे गि.सु.:-मी आज रोजी मा.सभापती साहेबांकडेस दिलेल्या यादी प्रमाणे दि.२८/२/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करताना सारसनगर व आयुर्वेद कॉलेज जवळील सीना नदीवर बांधावयाचे पुलाचे कामावर देखरेख करणे साठी नेमलेली मा.स्थायी समिती सदस्यांची कमेटी रद्द करण्यात यावी.आपले कमेटी नेमणेच्या निर्णयामुळे सदर पुलाचे कामात अडचणी निर्माण होतील.

मा.श्री. जोशी अ.सु :- सदर सभेचे इतिवृत्त कायम करणे साठी आपले समोर आहे. पुलाचे कामी नेमलेली कमेटी रद्द करण्यांत यावी कार्यवृत्त कायम करावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- कमेटी नेमल्याने आपला काय तोटा आहे. कमेटी रद्द करा. मात्र सदर कामी म.न.पा चे शहर अभियंता तसेच नगर शहरातील तज्ञ इंजिनिअर / आर्किटेक्ट यांची कमेटी नेमण्यांत यावी. पुलाचा खर्च आपण करणार आहोत.

मा.श्री. जोशी अ.सु.:- शहर अभियंता यांनाच फक्त कमेटीवर ठेवावे. पुलाचे बांधकाम तयार केलेल्या एस्टीमेट नुसार च होईल. एस्टीमेट जास्त वाढणार नाही.

मा.उपायुक्त श्री.देशमुख साहेब(सा):-डी.एस्.आर रेट प्रमाणे एस्टीमेट तयार केलेले आहे.पी. डब्ल्यु.डी. चे दृष्टीने त्यामध्ये किरकोळ बदल होतील जास्त प्रमाणात एस्टीमेट वाढणार नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- आपले इंजिनिअर पुलाचे बांधकाम करू शकत नाहीत का ?

मा.श्री. जोशी अ.सु. :- सर्वानुमते नेमलेली कमेटी रद्द करण्यात यावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- शहरामधील इंजिनिअर / आर्किटेक्ट मानधन न घेता सुपरव्हीजन करण्यास तयार होतील.त्याची कमेटी सदर कामी नेमावी.

मा.श्री. तिवारी सु.र. :- स्थानिक नगरसेवकांना कमेटीवर घ्यावे.

मा.सौ. काळे गि.सु. :- पावसाळया पूर्वी सदर कामे पूर्ण होणे आवश्यक आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- कमेटी मुळे सदर कामास उशिर होतो. असे म्हणता येणार नाही. आपण पैसे खर्च करणार आहोत आपले कमेटीची अडचण का होते.

मा.श्री. जोशी अ.सु. व मा.सौ. काळे गि.सु.:- पी.डब्ल्यु डी आपले कमेटीची अट मान्य करणार नाहीत.

मा.श्री. तिवारी सु.र. :- शहर अभियंता यांचीच पुलाचे सुपर व्हीजन साठी नेमणूक ठेवावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- शहर अभियंता व शहरामधील इंजिनिअर / आर्किटेक्ट याची कमेटी नेमावी.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पुलाची कमेटी रद्द करण्यात येउन कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- मग स्थायी समितीचे निर्णयाला काय महत्व आहे पी.डब्ल्यु.डी पुलाचा खर्च दुप्पट करेल.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पाईप खरेदी बाबत म.न.पा.चे कायदेशिर सल्लागार यांचे मत घेणे बाबत निर्णय घेतला होता. त्या प्रमाणे मा.सभापती साहेब यांनी मत मागवून घ्यावे.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं.:-पाणी टॅन्करच्या निविदा मा स्थायी समिती पुढे उशिरा मंजूरीसाठी पाठविल्याने म.न.पाचे झालेले आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करून संबंधीतावर कार्यवाही करावी.

मा.श्री.जोशी अ.सु.:-दिनांक १७/२/२००७व दिनांक२८/२/२००७रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- दिनांक ५/३/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करावे. कोठी ते यश पॅलेस पर्यत चे ड्रेनेज लाईनचे कामाचे काय झाले.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी. :- मा.स्थायी समितीने पारीत केलेल्या ठरावावर रिपोर्ट सादर केलेला आहे.

मा.त्रिपाठी सु.चं.:- मा.स्थायी समितीने दिलेल्या मंजूरी प्रमाणे कार्यवाही करावी. सदरचे काम पूर्ण कधी होणार

मा.उपायुक्त साहेब (सा ) :- सदरचा रिपोर्ट मा.स्थायी समिती पुढे येईल.

मा.श्री.जोशी अ.सु. :- सदर कोठी ते यश पॅलेस पर्यत ड्रेनेज लाईन टाकणे विषयी प्रस्ताव फेर विचारार्थ आपले पुढे येईल त्या वेळी सदर बाबतीत निर्णय घेउ दिनांक ५/३/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करावे.

मा.उपायुक्त श्री. देशमुख साहेब (सा) :- कामे लवकर होण्यासाठी आपण आता ही निर्णय घेउ शकता.

मा. श्री. जोशी अ.सु.:- सदचा प्रस्ताव आमचे कडे पाठविणेत यावा पुढील सभे मध्ये निर्णय घेउ दिनांक २०/३/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करावे.

मा.श्री. घुले अ.ह. :- सर्व सभांचे कार्यवृत्त कायम करावे.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा दिनांक २८/२/२००७ ठराव क्रमांक दोन मधील सारसनगर व आयुर्वेद कॉर्नर ते काटवण खंडोबा रोड दरम्यान सीना नदीवर सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे मार्फत पुल बांधणेचे कामास दिलेल्या मंजूर ठरावा मधील सदर पुलाचे कामाचे पहाणी साठी व त्यावर नियंत्रण ठेवणे कामी नेमलेली कमेटी रद्द करण्यास व मा.स्थायी समिती सभा दिनांक १७/२/२००७, दिनांक २८/२/२००७ , दिनांक ५/३/२००७ व दिनांक २०/३/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक २८/२/२००७ ठराव क्रमांक दोन नुसार सारसनगर व आयुर्वेद कॉर्नर ते काटवण खंडोबा रोड दरम्यान सीना नदीवर सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे मार्फत पुल बांधणेचे कामास दिलेल्या मंजूर ठरावा मधील सदर पुलाचे कामाचे पहाणी साठी व त्यावर नियंत्रण ठेवणे कामी नेमलेली कमेटी रद्द करण्यास तसेच मा.स्थायी समिती सभा दिनांक१७/२/२००७,दिनांक २८/२/२००७,दिनांक ५/३/२००७व दिनांक २०/३/२००७ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. घुले अ.ह.

अनुमोदक :- मा.श्री. जोशी अ.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक :-२ दिनांक ७/४/२००७

ठराव क्रमांक :- २ दिनांक ७/४/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील वाडीया पार्क ते म.न.पा. कार्यालय,बेग पटांगण, तरव्ती दरवाजा ते माणिक चौका पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** १२ वा वित्त आयोग अंतर्गत मागविण्यांत आलेल्या जाहीर निविदां बाबत.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंती रिपोर्ट की,१२ वा वित्त आयोग अंतर्गत मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक-४ दि.१७/७/०६अन्वये खाली नमुद केलेल्या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

| अ.नं | कामाची नांवे | निविदा रक्कम |
|---|---|---|
| १ | अहमदनगर म.न.पा. हद्दी मधील सारसनगर येथे भिंगारनाल्या वर पुल बांधणे | रू.१८,९४,६८१/- |
| २ | अहमदनगर म.न.पा. हद्दीत आयुर्वेद हॉस्पीटल ते काटवन खंडोबा दरम्यान जाणा-या रस्त्या वरील सीना नदी वर पुल बांधणे | रू. ३९,७५,६५५/- |
| ३ | अहमदनगर म.न.पा.हद्दीतील वाडीयापार्क ते महानगरपालिका कार्यालय बेग पटांगण तरव्ती दरवाजा ते माणिकचौक पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रू. २३,८०,४१२/- |

त्या नुसार सदरचा प्रस्तावास मा.शासन निर्णय नगर- विकास क्र. बा वि आ १००६ / प्र.क्र ९०/ २००६.नवि- १६ दिनांक २०/१/२००६ नुसार प्रशासकीय मंजूरी मिळाले प्रमाणे वरील कामांच्या जाहीर निविदा दै. लोकसत्ता मध्ये दिनांक २५/१/०७ रोजी प्रसिध्द करण्यांत आली.

दि.२९/१/०७ ते दि.१३/२/०७ अखेर दु.२.०० वा.पर्यत कोरी निविदा फॉर्म विक्री करण्यांत आली. सदर मुदतीत अ.नं.३च्या एकूण ३ को-या निविदाची विक्री झाली. दिनांक १५/२/०७रोजी दु.२.०० वा. पर्यतच्या मुदतीत तीन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत. सिलबंद निविदा त्याच दिवशी मा.उपायुक्त (सा) यांचे कार्यालयात सांय. ६.०० वा. उघडण्यांत आल्या सदर निविदा दराचा तुलणात्मक तक्ता खालील प्रमाणे

| अ.नं | निविदा धारकाचे नांव | निविदा दरापेक्षा जास्त |
|---|---|---|
| १ | मे.ए.सी.कोठारी, अहमदनगर. | ११.९९ % जास्त |
| २ | मे. एस.एस. कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर. | २५ % जास्त |
| ३ | श्री. आर.एच. दरे, अहमदनगर | ३० % जास्त |

वरील तक्ता पाहता त्यामध्ये मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर यांचे आलेले निविदा दरा पेक्षा ११.९९ % जादाचे दर हे स्पर्धात्मक दृष्टया सर्वात लोएस्ट आलेले आहेत.

सदर कामाचे अंदाज पत्रक सन २००५-२००६ चे सार्व.बांधकाम विभागाचे दरसुची नुसार करण्यांत आले आहे. सन २००६-२००७ चे सार्व.बांधकाम विभागाचे दरसुची नुसार सुधारित अंदाजपत्रक केले असता आलेले सर्वात कमी निविदादर हे सुधारित अंदाजपत्रका पेक्षा ५%जास्त आहेत व वाजवी वाटतात.तरी निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री. सोनटक्के व्ही.जी. यांचा रिपोर्ट असे.

शहर अभियंता श्री.एन.बी.मगर :- शाखा अभियंता यांचे अहवालाप्रमाणे सर्वात कमी दराचे निविदा दर (११.९९ % जादा) हे चालू सन २००६-०७ च्या डी .एस.आर. दरापेक्षा ५% जादा असून वाजवी वाटतात मंजूर करण्यांस हरकत नाही. तथापी आदेशार्थ सादर. दि. १७/२/०७

अंतर्गत लेखा परिक्षक :- छाननी समिती समोरNigociationकरिता बोलावून निर्णय घेणे योग्य. दि.२०/२/०७

मा.फेर सादर,

वाडीया पार्क म.न.पा. कार्यालय डॉ. होशिंग हॉस्पीटल ते तरव्ती दरवाजा मशिद, माणिक चौक रस्त्यांचे डांबरी करण करणेचे कामाचा तुलणात्मक तक्ता छाननी समिती मध्ये सादर करणेत आला समिती मध्ये स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी निविदा धारकांने निविदे मध्ये भरलेले दर ११.९९ %अंदाजपत्रका पेक्षा जास्त दर कमी करून सदरचे काम ९.९९ % जादा दराने काम करणेची संम्मती दिली आहे. सदर दराची सन २००६-०७ चे दराशी तुलणा केली असता निविदा धारकाने कमी केलेले ९.९९ % जादा दर हे सुधारित अंदाजपत्रका पेक्षा ३.१२ % जादा येत आहेत. वाटाघाटी नुसार निविदा धारकाने दिलेले दर ९.९९ % अंदाजपत्रका पेक्षा जास्त मंजूर करणेची शिफारस करणेत आली आहे.आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे श्री. सोनटक्के व्ही. जी. शाखा अभियंता यांचा अहवाल असे. दि.६/३/०७

शहर अभियंता श्री.मगर एन् .बी. :- छाननी समितीच्या शिफारसी नुसार मंजूरीस्तव सादर (सन-२००६-०७च्या D.S.R दरापेक्षा ३.१२ % जादा) दि.९/३/०७.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- मान्यतेस हरकत नाही.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु.:- ऑफीस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.शेख मुदस्सर अ.इ.:-या प्रस्तावा वर सभेमध्ये चर्चा होउ द्यावी. प्रस्ताव मंजूर करू नका. या रस्त्याचे पॅचिंगचे काम आत्ताच केलेले आहे.सदरचे पॅचिंगचे कामासाठी किती खर्च झालेला आहे.

मा. उपायुक्त श्री. देशमुख साहेब (सा) :- खर्च लगेच सांगता येणार नाही.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- सदर रस्त्याचे पॅचिगंचे कामी झालेला खर्च हा या रस्त्याचे कामाचे एस्टीमेट मधून कमी करावा या ठेकेदारास काम देणेस आपले कमेटीने विरोध केलेला होता. या ठेकेदारास ब्लॅक लिस्ट मध्ये टाकणे बाबत चर्चा केलेली होती.

मा.श्री. जोशी अ.सु. :- सदर ठेकेदारास ब्लॉकलिस्ट मध्ये टाकलेले नाही. ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- हया प्रस्तावाचे मंजूरी साठी मतदान घेण्यांत यावे.

मा.श्री. मैड स.ब. :- हा विषय मंजूरी साठी नंतर घ्यावा.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. , मा.श्री. शेख आरीफ शेख र, मा.श्री.सय्यद सादीक आ, मा.सौ. पवार स.बा, आणि मा.सौ. कांबळे मं.रा. सदरचे प्रस्ताव मंजूरीस आमचा विरोध नोंदवावा.

मा.श्री. मैड स.ब.:- मा.स्थायी समिती सभेने एकमताने निर्णय घ्यावा.

मा.श्री. जोशी अ.सु.व मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- ऑफीस रिपोर्ट बहुमताने मंजूर.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट बहुमताने मंजूर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील वाडीया पार्क ते म.न.पा. कार्यालय,बेग पटांगण, तरव्ती दरवाजा ते माणिक चौका पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील वाडीया पार्क ते म.न.पा. कार्यालय,बेग पटांगण, तरव्ती दरवाजा ते माणिक चौका पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता आलेले कमीचे निविदा दर धारक मे. ए.सी. कोठारी,अहमदनगर यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या अंदाजपत्रकीय रकमे पेक्षा नउ पुर्णाक नव्याण्णव टक्के जादा या कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

सदरचे ठरावास मा.स्थायी समिती सदस्य मा.श्री.शेख मुदस्सर अ.इ. ,मा.श्री. शेख आरिफ शे.र., मा. श्री.सय्यद सा.आ., मा.सौ. पवार स.बा., मा.सौ.कांबळे मं.रा. यांचा विरोध.
नियामनुसार पुढील कार्यवाही करावी.
सुचक :- मा.श्री. जोशी अ.सु.

अनुमोदक :- मा.श्री. त्रिपाठी सु.चं.
ठराव बहुमताने मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १**
**सन २००६-२००७.**

विषय क्रमांक :- ३ दिनांक ७/४/२००७.

ठराव क्रमांक :- ३ दिनांक ७/४/२००७.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या दैनंदिन स्वच्छते करिंता जुने शहर स्वच्छते करिता खाजगी तत्वावर राबविणेस देणे बाबत मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** महानगरपालिकेच्या दैनंदिन स्वच्छते करिता जुने शहर खाजगी तत्वावर राबविण्यांस देणे बाबत मा.महानगरपालिका ठराव नं.४ दि.२६/१२/०६ च्या मान्यते नुसार दि.२/२/२००७ चे दैनिक नगर टाईम्स दैनिक सामना दैनिक पुण्यनगरी या वर्तमान पत्रातून जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द केल्या नुसार दि. ३/२/०७ ते २३/२/०७ या कालावधीत एकूण १४ टेंडर फॉर्मची विक्री झालेली आहे. टेंडर फॉर्म सोबत दिलेल्या अटी शर्ती मध्ये सर्व प्रकारचा दर कर ठेकेदाराने भरावयाच्या आहे अशी अट नमुद करून निविदा प्रसिध्द केली.

दि.२१/२/२००७ रोजी निविदा पूर्व बैठक (Pre- Bid Meeting) मा.आयुक्त साहेब यांचे दालनात घेण्यांत आली सदर मिटींग मध्ये असे ठरले की, सर्व्हिस टॅक्स म.न.पा. भरेल व त्या प्रमाणे ठेकेदारांनी निविदा दर भरावेत अशा सुचना मा.आयुक्त साहेब यांनी मिटींग मध्ये दिल्या.

त्या नुसार दिनांक २६/२/२००७ पर्यत मुदतीत टेंडर बयाना रकमे सह एकूण ८ निविदा धारकांच्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या प्रमाणे त्याच दिवशी दुपारी ४.३० वाजता मा.उपायुक्त (सा) यांचे दालनात मा.उपायुक्त (सा) ,मा.उपायुक्त (कर) अंतर्गत लेखापरिक्षक यांचे समोर व निविदा धारकांच्या उपस्थीतीत उघडण्यांत आल्या उघडण्यांत आलेल्या निविदांचा तुलणात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता मे आसराग्रुप अ.नगर यांनी रू.९५,००,०००/- फक्त (रूपये पंच्याण्णव लाख फक्त) नमुद करून सर्व्हिस टॅक्स मनपाने भरावा असे नमुद करून निविदा भरली आहे.

नंबर २ प्रमाणे कमी दराची निविदा मे. समिक्षा कंन्स्ट्रक्शन ठाणे यांची रू.१,०५,५०,२५०/- फक्त दर नमुद केलेली आहे. त्या मध्ये त्यांनी टॅक्स म.न.पा भरणार की स्वता: भरणार याचा उल्लेख नाही परंतु निविदा पूर्व बैठकी मध्ये (Pre- Bid Meeting) मे. समिक्षा कंन्स्ट्रक्शन ठाणे यांचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थीत होते त्या मुळे मिटींग मध्ये झालेल्या चर्चे ची नोंद घेउनच निविदाकरांनी निविदा दर हे म.न.पा. सर्व्हिस टॅक्स भरणार आहेत असे समजून निविदा दर भरलेले आहेत असे दिसते.

तरी तुलणात्मक तक्ता पहाता मे.आसरा ग्रुप अ.नगर यांचा दर रू.९५,००,०००/-फक्त हा सर्वात कमी आहे व त्यांनी दिनांक ९/३/०७रोजी पत्र देउन कळविले आहे की, रू.९५,००,०००/- सर्व टॅक्स स्वता:भरण्यांस तयार असून सदर रू.९५,००,०००/-मध्ये काम करण्यांची तयारी दर्शविली आहे.

तरी मे.आसरा ग्रुप,अ.नगर यांचा निविदा दर सर्व दर करासह रू.९५,००,०००/-हा सर्वात कमी असल्याने त्यामध्ये महानगरपालिकेचा आर्थीक लाभ होत असल्याने सदर दरांस मंजूरी देणे योग्य वाटते.

तरी मंजूरीस्तव सविनय सादर व उर्वरित निविदाधारक यांची भरून घेण्यांत आलेली बयाना रक्कम परत करण्यांस मंजूरी मिळणेस विनंती.

अंदाजपत्रकिय तरतूद सन २००७-२००८

खाजगी तत्वावर कचरा संकलन / वाहतूक - रू.१,००,०००,००/-

येणे प्रमाणे वैद्यकीय आरोग्याधिकारी अहमदनगर महानगरपालिका यांचा अहवाल असे.

अंतर्गत लेखा परिक्षकः-निविदा,छाननी समितीचे निर्णयानुसार प्रस्ताव"अ"प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब (कर):- प्रस्ताव मंजूरी साठी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे योग्य दि.२२/३/०७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा

मा.सौ. शेंडगे रो.सं. :- या प्रस्तावाचे मंजूरीस माझा विरोध नोंदवावा.

मा.श्री.तिवारी सु.र.:- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा

मा.श्री. बोरूडे अ.व.आणि मा.श्री.बारस्कर पो.ज. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- धोरणात्मक प्रस्ताव मा.जनरल बोर्डाने मंजूर केलेला आहे.ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा मा.-आयुक्त साहेबांनी या प्रकरणी कायदेशीर बाजू तपासून पुढील कार्यवाही करावी.

मा.सभापती साहेब :- दैनंदिन स्वच्छते करिता जुने शहर खाजगी तत्वावर राबविण्यांस देणे विषयीचा धोरणात्मक निर्णय मा.जनरल बोर्डाने घेतलेला आहे प्रशासनाने त्या प्रमाणे निविदा मागवून तुलणात्मक तक्ता मंजूरी साठी सभे पुढे ठेवलेला आहे. कार्यालयीन प्रस्ताव बहुमताने मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या दैनंदिन स्वच्छते करिंता जुने शहर स्वच्छते कामी खाजगी तत्वावर राबविणेस देणे बाबत मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता मे.आसरा ग्रुप अहमदनगर यांचे तुलणात्मक दृष्टया कमीचे दरास व सदर कामी मा.आयुक्त साहेबांनी कायदेशिर बाबी तपासून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

सदरचे ठरावास मा.स्थायी समिती सदस्या मा.सौ. शेंडगे रो.सं. यांचा विरोध.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

ठराव बहुमताने मंजूर.

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १**
**सन २००६-२००७.**

विषय क्रमांक :- ४ दिनांक ७/४/२००७

ठराव क्रमांक :- ४ दनांक ७/४/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक तेवीस मधील एक खोली कै. दत्तात्रय जाधव सार्वजनिक वाचनालया साठी अर्जदार श्री. धनंजय कृष्णा जाधव, यांना भाडे तत्वावर देणेस मंजूरी देणे बाबत स्थायी समिती सदस्य मा.श्री. बोरूडे अ.व., मा.श्री. जोशी अ.सु., मा.श्री. घुले अ.ह., मा.श्री. तिवारी सु.र. व मा.श्री. त्रिपाठी सुनिल यांची यादी.

**प्रस्तावाचा मजकुर :-** उपरोक्त विषयानुसार यादी देण्यांत येते की, अर्जदार श्री.धनंजय कृष्णा जाधव यांनी आपणा कडेस महानगरपालिकेची शाळा क्र. २३ मधील १ खोली भाडे तत्वावर कै, दत्तात्रय जाधव सार्वजनिक वाचनालया करिता मिळणे साठी अर्ज केलेला आहे. सदर शाळे मधील वर्ग खोल्या रिकाम्या असल्यामुळे अर्जदार यांना वाचनालयासाठी खोली देणे बाबत सदरचा विषय आयत्या वेळच्या विषयात घेवून खोली वाचनालयासाठी भाडे तत्वावर देण्यांस मंजूरी देण्यात यावी.

मा.स्थायी समिती सदस्य यांच्या वरील प्रमाणेचे यादीवर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सदस्य यांनी कै. दत्तात्रय जाधव सार्वजनिक वाचनालया करिता म.न.पा.चे शाळा क्रमांक २३ मधील एक वर्ग खोली अर्जदार श्री.धनंजय कृष्णा जाधव यांना भाडे तत्वावर देणेस मंजूरी देणे बाबतची यादी माझ्या कडेस दिलेली आहे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- यादी मंजूर करण्यात यावी.

मा.श्री.जोशी अ.सु. :- आयत्या वेळचा विषय म्हणून अर्जदार श्री. जाधव यांना कै. दत्तात्रय जाधव सार्वजनिक वाचनालया साठी म.न.पा. शाळा क्र.२३ मधील एक खोली भाडे तत्वावर देणेस मंजूरी देण्यात यावी. म.न.पा चे शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी यांनी प्रस्ताव तयार करून प्रशासना कडेस पुढील तजविजी करिता पाठवावा.

मा.सौ.भागानगरे म.प्र. :- यादी मंजूर करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- आयते वेळचा विषय म्हणून सर्वानुमते यादी मंजूर.

<u>**ठराव :-**</u>कै. दत्तात्रय जाधव सार्वजनिक वाचनालया करिता अर्जदार श्री. धनंजय कृष्णा जाधव यांना म.न.ना.चे शाळा क्रमांक तेवीस मधील एक खोली भाडे तत्वावर देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. यादी मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. तिवारी सु.र.

अनुमोदक :- मा.सौ. भागानगरे म.प्र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.